# सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई
## नागरी सनद

**(१) प्रस्तावना :**

सार्वजनिक बांधकाम विभागाला १५० वर्षाहुन अधिक वर्षाची दैदिप्यमान व गौरवशाली परंपरा आहे. बीड जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई या विभागा अंतर्गत अंबाजोगाई येथे श्री. योगेश्वरी देवीचे मंदीर, आद्य कवी मुकूंदराज स्वामींची समाधी, पासोडीकर दासोपंताचे मंदीर, हत्तीखाणा, खोलेश्वर मंदीर, तसेच स्वामी रामनंद तिर्थ ग्रामिण वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय असून धर्मापुरी येथील किल्ला, व सर्वधर्मीयांचे हजरत सय्यद सादेकअली शाह दर्गाह सायगांव यांचा ऊरूस सायगांव येथे दरवर्षी भरतो, परळी येथे श्री. वैद्यनाथ हे बारा ज्योतीर्लींगापैकी एक ज्योतीर्लींग आहे. भारतातील एकमेव असे माजलगांव तालुक्यातील हेमाडपंथी श्री. पुरूषोत्तम मंदीर पुरूषोत्तमपुरी येथे आहे. तसेच केशवराज मंदीर, गोदावरी पात्रातील श्री. मोरेश्वर मंदीर, माजलगांव धरण आहे. केज तालुक्यातील मांजरा धरण तसेच केज येथील हजरत खाव्जा मजहबोद्दीन साहेब दर्गाह व श्री. स्वामी समर्थ यांचे मठ तसेच धारूर येथील किल्ला व अशा ऐतिहासीक पार्श्वभूमीने नटलेला बीड जिल्हयातील अंबाजोगाई विभाग हा असा विभाग आहे. सध्याच्या सार्वजनिक बांधकाम मंडळ उस्मानाबाद अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई, विकासाभिमुख प्रकल्प राबविण्यात सतत अग्रेसर असतो. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई हे कार्यालय शासकीय विश्रामगृहा समोर रमाबाई चौक येथे आहे. या विभागांतर्गत अंबाजोगाई, केज, धारूर, परळी, माजलगांव या तालुक्यांचा समावेश आहे. सध्या या विभागांतर्गत अंबाजोगाई मुख्यालयी सार्वजनिक बांधकाम स्वा.रा.ति. वैद्यकिय महाविद्यालय, परीसरात विशेष प्रकल्प उप विभाग कार्यरत आहेत, या शिवाय यांत्रिकी कार्यशाळा सुध्दा अस्तित्वात आहे. व विभागांतर्गत तालुक्याच्या मुख्यालयी अंबाजोगाई, केज, धारूर, परळी, माजलगांव या ठिकाणी सार्वजनिक बांधकाम उप विभाग कार्यरत आहेत. या विभागाकडुन रस्ते, पुल व इमारतीचे निर्माण तसेच देखभाल व दुरूस्तीचे कामे केली जातात.

या विभागाच्या कार्यक्षेत्रात प्रमुख राज्यमार्ग ३१.०० कि.मी., राज्यमार्ग ५४०.२० कि.मी., प्रमुख जिल्हा मार्ग ३२५.४० कि.मी. अशा दर्जाची एकुण लांबी ८९६.६० कि.मी. आहे. या रस्ते लांबीत सर्वसाधारण पणे ३३ मोठे पुल, १४७ मध्यम पुल, १३३१ नळकांडी पुल तसेच कार्यालयीन

इमारती २३३९६.३६ चौ.मी., निवासी इमारती ११८६९.५१ चौ.मी. अशा एकूण ३५२६५.८७ चौ.मी. क्षेत्रफळाच्या राज्यक्षेत्रातील इमारतींची निगराणी करण्यात येते.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई हे विभागांतर्गत कार्यक्षेत्रातील सार्वजनिक बांधकामाच्या अनुषंगाने नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटीबद्ध आहे. ही बांधिलकी कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अंबाजोगाई या सनद द्वारे जाहिर करत असून ती स्विकारीत आहे. हे कार्यालय नागरिकांना कार्यालयीन सुविधा पुरविण्यास बांधील आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारीत केलेल्या व पारदर्शीत केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक वागणूकीने उपलब्ध करून देणे व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडविणे हा दृष्टीकोन विचारात घेऊन सदरच सर्वसामान्य नागरीकांसाठी ही सनद तयार करण्यात आली आहे.

१) विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील रस्त्यांची देखभाल दुरुस्ती मानकाप्रमाणे करून रस्त्याचा दर्जा उत्तम राखण्याचा प्रयत्न करणे.

२) कार्यालयीन विभागाच्या अखत्यारीतील शासकीय इमारतींची (कार्यालयीन व निवासी इमारती) बांधकाम खात्याने ठरवलेल्या मानकानुसार परिपूर्ण करण्याचा कटाक्ष ठेवणे.

३) या विभागाच्या कार्यालयाशी संलग्न असलेल्या सा.बां. उप विभागांना तांत्रिक सल्ला देणे व शासकीय मानकाप्रमाणे सुसूत्रता ठेवणे.

४) या विभागाच्या कार्यालयात प्रतिसाद वेळापत्रक प्रदर्शित करणे.

५) आपत्कालीन व्यवस्थेसाठी (जसे महापुरामुळे वाहतूक बंद पडलेल्या रस्त्याची दुरुस्ती करून वाहतूक पूर्ववत सुरळीत करणे) तत्परतेने अभियांत्रिकीशी संबंधीत आवश्यक ती कामे करणे व मदत करणे

६) विभागीय कार्यालयातील सर्व कर्मचारी वर्गाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या फलकावर जाहिररित्या प्रदर्शित करणे.

७) या विभागीय कार्यालयात ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी/ तक्रारी ऐकणे व त्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे.

८) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत या विभागाच्या अखत्यारीतील संबंधीत माहिती अधिकारी यांचेकडून नागरिकांनी माहिती संबंधितांना विहित मुदतीत उपलब्ध करून

९) कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून व आधुनिकता आणून या विभागीय कार्यालयाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची लोकाभिमुखता वाढविणे.

१०) संगणकीकरण करून या विभागाच्या अंतर्गत सर्व उप अभियंता कार्यालये यांना अवगत करणे व नेटवर्कने जोडणे, अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, उस्मानाबाद यांना नेटवर्कद्वारे आवश्यक व तातडीची माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

११) या कार्यालयाच्या अंतर्गत आवश्यक व अद्यावत विविध माहिती त्वरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या **www.mahapwd.com** या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

१२) कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करून अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत ठेवणे.

१३) नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिद्धी देणे.

**२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी :**

❖ **कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग अंबाजोगाई कार्यालयाची बांधीलकी :-**

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, अंबाजोगाई.

(अ) स्वच्छ गुणवत्तेची बांधीलकी ठेवील.

(ब) सौजन्यपूर्ण व मदतीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करणे.

(क) पारदर्शकता व निष्ठा ठेवतील. याशिवाय वेळोवेळी विविध परवानापत्रे / प्रमाणपत्रे / ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी कार्यपध्दती, पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यात येतील.

❖ **नागरीकांची जबाबदारी :-**

१) शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याशी नागरीकांची वर्तणूक सौजन्यपूर्वक असावी.

२) नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

३) नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

४) विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरू नये.

५) सार्वजनिक मालमत्तांच्या अवस्था पाहण्यास सहकार्य करावे.

६) नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे दूर करावीत व पुन्हा सरकारी जागेवर अतिक्रमण करू नये.

७) रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना असणाऱ्या वृक्ष रोपांचे जतन करणे ही नागरिकांची सुद्धा जबाबदारी राहील.

८) नागरिकांनी कायदेशीर तरतुदी, नियम, अलिखीत संकेत यांचे पालन करावे.

९) नागरिकांनी सार्वजनिक हित, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

**३) कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, अंबाजोगाई कार्यालयाची रचना :**

अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, उस्मानाबाद यांचे अधिपत्या खालील बीड जिल्ह्यामध्ये कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अंबाजोगाई हे कार्यालय शासनाने सुमारे १२/१९९४ मध्ये स्थापन केले आहे. कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, अंबाजोगाई अंतर्गत उप अभियंता सा.बां. उप विभाग, अंबाजोगाई, वि.प्र. उपविभाग अंबाजोगाई, सा.बां. उपविभाग केज, सा.बां. उपविभाग धारूर, सा.बां. उपविभाग परळी, सा.बां. उपविभाग माजलगाव असे उप विभाग असून त्यांचेकडे सर्वसाधारणपणे त्या त्या तालुक्यांचे कार्यक्षेत्र येते. या कार्यालयाच्या अधिपत्याखाली एकूण एक उप कार्यकारी अभियंता व ६ उप अभियंता कार्यरत आहेत. तसेच कार्यकारी अभियंता व उपविभाग यांचा गुणात्मक दर्शविणारा एक तक्ता परिशिष्ट अ म्हणून संलग्न जोडला आहे.

या विभागाच्या अधिनस्त क्षेत्रातील उप अभियंता, सा.बां. उपविभाग हा खऱ्या अर्थाने माहितीचा स्रोत असतो. कुठल्याही बांधकामाची सविस्तर माहिती अगदी सुरुवातीपासून उप अभियंता यांचे कार्यालयाकडून मिळू शकते. प्रस्तावित नमूद केलेल्या सार्वजनिक सेवा उप अभियंता सा.बां. उप विभाग, पुरवित असतो. या विभागांतर्गत कामाच्या अमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली लेखा संहिता, विनिर्देश, वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादींचे काटेकोरपणे पालन संबंधित कार्यालयाकडून केले जाते.